प्रेस नोट दिनांक - ०६.०३.२०२०

## कर्नाटक राज्यातील यल्लापूर येथे जबरी चोरी करुन पसार झालेल्या मध्यप्रदेश धार येथील टोळीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेकडून जेरबंद.

---

कर्नाटक राज्यातील दक्षिण कर्नाटक जिल्हयातील यल्लापूर पोलीस ठाण्याचे हद्दीत दि. ०४.०३.२०२० रोजी रात्रीच्या सुमारास मध्यप्रदेश येथील काही सराईत गुन्हेगारांनी चाकु - सुऱ्याचा धाक दाखवुन रोख रक्कम १,००,०००/- रुपये व सोन्याचे दागिन्याची लुटमार केली. व पल्सर मोटर सायकल चोरुन घेवुन गेले होते. त्याबाबत यल्लापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५३/२०२० भा. दं. वि. कलम ३९२, ५०६ व ५४/२०२० भा दं वि कलम ३९२, ४२७, ५०६ प्रमाणे दोन गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे. सदर अज्ञात आरोपीत यांचेबाबतची, चोरीस गेलेल्या मालाची तसेच पल्सर मोटर सायकलची माहीती कर्नाटक पोलीसांनी इकडील कार्यालयात दिलेली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री सुनिल धनावडे यांनी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या दोन विशेष टिम तयार करुन आरोपी यांचेबाबत माहीती काढण्यास रवाना केले. त्यानुसार सदर अज्ञात आरोपीत यांचा शोध घेण्याकामी सिंधुदुर्गनगरी जिजामाता चौक या ठिकाणी अचानक पणे नाकाबंदी करीत असताना दुपारी १६-४५ वाजण्याचे सुमारास एक निळ्या काळ्या रंगाची नंबर प्लेट नसलेली पल्सर मोटर सायकलवरती दोन इसम संशईत रित्या येत असताना दिसले. त्या मोटर सायकल स्वारांना थांबविले. त्यावेळी ते दोघे मोटर सायकल टाकून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना पोलीसांनी जागीच धरले. त्यांची झडती घेता त्यांचे ताब्यात दोन सोन्याची मंगळसुत्रे, दोन सोन्याच्या अंगठया, तीन सोन्याच्या बांगडया, एक चांदीचा पेला, एक चांदीचे नाणे व रोख रक्कम २५,०००/- रुपये असा एकूण २,४५,०००/- रुपये किमतिचा मुद्देमाल मिळून आला. सदर आरोपीत यांना पुढील योग्य त्या कार्यवाही करीता कर्नाटक यल्लापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक महांतेश नायक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई ही मा पोलीस अधीक्षक श्री दिक्षीत गेडाम, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री तुषार पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक श्री सुनिल धनावडे, पोलीस उप निरीक्षक सचिन शेळके, पोलीस कर्मचारी सुभाष खांदारे, सुधीर सावंत, लक्ष्मण साळूंखे, कृष्णा केसरकर, प्रवीण वालावलकर, अमित तेली, सत्या पाटील, चंद्रकांत पालकर, रवि इंगळे, ज्ञानेश्वर कांदळगांवकर, जयेश सरमळकर, प्रथमेश गावडे यांनी केलेली आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थागुशा, सिंधुदुर्ग

मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग
यांचे मान्यतेने.